**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०२ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विविध मुद्द्यांवरून आजही संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ; कामकाज दिवसभरासाठी तहकूब.**
2. **राज्यात सत्ता स्थापनेच्या वाटाघाटींना वेग; मुख्यमंत्री पदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता.**
3. **नक्षल्यांच्या पीएलजीए सप्ताहास प्रारंभ; अनुचित घटना टाळण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त.**
4. **फेंगल चक्रीवादळाच्या परिणामस्वरूप विदर्भात किमान तापमानात वाढ, उद्या गडचिरोलीत पावसाची शक्यता.**

**-----------------------------------------**

**संसद**

**अदानी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण आणि संभलमधल्या हिंसाचारासह विविध मुद्द्यांवरून आजही दोन्ही सभागृहात गदारोळ झाल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेत सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी अदानी, संभल आणि मणिपूर या मुद्द्यांवर चर्चेची मागणी केली. सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू केल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली. गोंधळ सुरूच राहिल्याने सभापतींनी कामकाज आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं. राज्यसभेतही याच मुद्द्यांवरून विरोधकांनी दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी केल्यामुळे राज्यसभेतही गदारोळ सुरू झाला. अध्यक्षांनी चर्चा करण्याची विनंती करूनही गोंधळ सुरूच राहिल्याने त्यांनी सभागृहाचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं. संसदेत घोषणाबाजी करून कामकाजात अडथळे आणल्याबद्दल केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी विरोधकांवर टीका केली आहे. अशा प्रकारची अडवणूक म्हणजे जनतेच्या पैशाची उधळपट्टी असल्याचा आरोपही सिंह यांनी केला आहे. संसद सदनाबाहेर ते माध्यमांशी बोलत होते. दरम्यान, अदानी प्रकरणासह विविध मुद्यांवर विरोधकांनी केलेले स्थगन प्रस्ताव सरकारन स्वीकारले नाहीत. कारण केंद्राला या मुद्द्यांवर चर्चा करायची नसल्याचा प्रत्यारोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मनिष तिवारी यांनी केला आहे.**

------------------------------------------

**ओम बिरला**

दरम्यान, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी हिवाळी अधिवेशनात सभागृहातील अडथळे दूर होऊन कामकाज सुरळीत चालाव यासाठी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांसोबत आज बैठक घेतली. या बैठकीत सर्व राजकीय पक्षांनी सभागृहाच कामकाज सुरळीत चालवण्याचं मान्य केलं आहे. दरम्यान दिनांक १६ आणि १७ डिसेम्बर रोजी राज्यसभेत संविधानावर चर्चा होणार आहे.

------------------------------------------

**सत्ता वाटाघाटी**

महाराष्ट्रात सरकार स्थापनेच्या दृष्टीनं महायुतीच्या घटक पक्षांमधे आजपासून वाटाघाटी पुन्हा सुरु होतील. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रकृती अस्वास्थ्यामुळे विश्रांतीकरता गावी गेले होते, ते परतले आहेत. आता आपली प्रकृती ठीक असून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा घेतील असं काल त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं. भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बेैठक झाल्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान येत्या गुरुवारी ५ डिसेंबरला आझाद मैदानावर महायुती सरकारचा शपथविधी होणार असून त्यादृष्टीनं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि इतर नेत्यांनी आज आझाद मैदानाची पाहणी केली.

------------------------------------------

**केंद्रीय निरीक्षक**

भाजपने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची महाराष्ट्राचे केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. हे केंद्रीय निरीक्षक उद्या, राज्यात येणार असून 4 डिसेंबरला भाजपचा गटनेता निवडला जाणार आहे. भाजपच्या केंद्रीय निरीक्षकांच्या उपस्थितीत विधिमंडळ पक्षाची बैठक होणार आहे.

------------------------------------------

**उद्धव ठाकरे**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतमोजणीमध्ये पोस्टल मतदान आणि इव्हिएममधील मतदानामध्ये तफावत दिसत आहे. पोस्टल मतदानाचा ट्रेंड इव्हिएममधील मतदानात दिसत नाही, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव आणि आमदार वरुण सरदेसाई यांनी आज मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी काही मतदारसंघातील उमेदवारांना मिळालेल्या

आकडेवारीची माहिती देखील दिली. या ट्रेंडबद्दलचा खुलासा निवडणूक आयोगान करावा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

-----------------------------------------

निवडणूक आयोग

दरम्यान, महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मतदान यंत्रांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोकलिंगम यांनी दिला आहे. ईव्हीएम गैरव्यवहारांबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीच्या नेत्यांकडून सतत आरोप केले जात आहेत, त्याचवेळी चोकलिंगम यांनी हे विधान केलं आहे. या प्रकरणी अधिकारी सखोल तपास करत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं.

-----------------------------------------

उपराष्ट्रपती

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हे देखील या कार्यक्रमाला संबोधित करतील. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून 'अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया' या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

-----------------------------------------

दिव्यांग दिन

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते उद्या आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त राष्ट्रीय दिव्यांग सशक्तीकरण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना नवी दिल्ली इथं होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

-----------------------------------------

मुदतवाढ

इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये ९ फेब्रुवारी या एकाच दिवशी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी शाळा नोंदणी आणि विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यात वाढ करण्यात आली असून

विद्यार्थ्यांना आता विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क आणि अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येणार असल्याचं राज्य परीक्षा परिषदेनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात सांगण्यात आलं आहे.

-----------------------------------------

पीएलजीए सप्ताह

नक्षल्यांच्या पीएलजीए सप्ताहास आजपासून प्रारंभ झाला. मात्र गडचिरोली जिल्ह्यात चोख पोलीस बंदोबस्त असल्यान आज कुठेही अनुचित घटना घडली नाही. २ डिसेंबर २००० रोजी नक्षल्यांनी पीपल्स लिबरेशन गुरील्ला आर्मी या सशस्त्र संघटनेची स्थापना केली. तेव्हापासून नक्षलवादी दरवर्षी २ ते ८ डिसेंबर या कालावधीत पीएलजीए सप्ताह पाळतात. या सप्ताहात ते हिंसक कारवाया करतात. परंतु आज पहिल्या दिवशी कुठेही अनुचित घटना घडली नाही. दुर्गम भागातील वाहतूक देखील सुरळीत सुरु होती, असं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

-----------------------------------------

जंतनाशक दिन

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 4 डिसेंबर रोजी चंद्रपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात राष्ट्रीय जंतनाशक दिना निमित्त 1 ते 19 वर्षे वयोगटातील 67 हजार 448 मुला-मुलींना शाळा तसच अंगणवाडीमध्ये जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहे. तसच 4 डिसेंबर रोजी गोळी घेण शक्य न झालेल्या मुला-मुलींना मॉप अप राउंडद्वारे 10 डिसेंबर रोजी जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे.

-----------------------------------------

रब्बी पेरणी

खरिपानंतर अमरावती जिल्ह्यात सरासरी १ लाख ४८ हजार ८७९ हेक्टर क्षेत्रावर रब्बी पेरणीच नियोजन कृषी विभागाच्या वतीन करण्यात आल आहे. आतापर्यंत ८२ हजार २३३ हेक्टरवर पेरणी झाली असून ही पेरणी 60 टक्के आटोपली आहे. गेल्या वर्षी १ लाख ६१ हजार ४५३ इतक्या हेक्टरवर पेरणी झाली होती.

-----------------------------------------

अपघात

भंडारा-तुमसर महामार्गावर मोहाडी हद्दीच्या शिवारात एमआयडीसी जवळ दुचाकी स्लीप होऊन झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू तर एक व्यक्ती जखमी झाली आहे. मृत युवक तिरोडा तालुक्यातील मुंडीकोटा येथील आहे.

-----------------------------------------

ऑनलाइन नोंदणी

पूर्ण बांधणी केलेल्या तीन चाकी मालवाहतूक आणि सात टनांपेक्षा कमी असलेल्या मालवाहतूक वाहनांची आता ऑनलाइन नोंदणी करता येणार. या वाहनांच्या नोंदणीचे अधिकार अधिकृत वाहन विक्रेत्यांना देण्यात आले असून, त्याबाबतचे परिपत्रक नुकतेच परिवहन विभागाने काढले. केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या तरतुदीनुसार वाहनांच्या नोंदणीसाठी राष्ट्रीय सुचना केंद्र (एनआयसी) यांनी "वाहन ४.०' संगणक प्रणाली विकसित केली आहे. मात्र, पूर्ण बांधणी नसलेल्या आणि प्रवासी वाहतूक वाहनांची नोंदणी मात्र आरटीओ कार्यालयातच होणार आहे, असेही या आदेशात म्हटले आहे.

-----------------------------------------

मनसुख मांडवीय

आरोग्य क्षेत्राला सुलभ आणि परवडण्याजोगं करण्याला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. मांडवीय यांनी आज सकाळी नवी दिल्ली इथं माध्यमांना बोलताना ही माहिती दिली. देशात २०१४ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या ३८७ होती, ती आता ७८० एवढी झाल्याचं मांडवीय म्हणाले.

-----------------------------------------

हवामान/पीक प्रभाव

पुद्दुचेरी आणि तामिळनाडू मध्ये आलेल्या फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे विदर्भात एकूण किमान तापमानात वाढ झाली आहे. सर्वात कमी किमान तापमान चंद्रपूर जिल्ह्यात 16 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. तर वर्धा, नागपूर, गोंदिया या सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमान 18 ते 19 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील किमान तापमान २१ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदविण्यात आलं. आज दिवसभर नागपुरात ढगाळ वातावरण होतं. आज गडचिरोली मध्ये तर उद्या चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ मध्ये पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.दरम्यान फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे चंद्रपूर जिल्ह्यात काल पासून ढगाळ वातावरण असून काही भागात रिपरीप पाऊस पडल्यान धानाची पोती वाचवितांना बळीराजाची तारांबळ उडाली. सद्या शेतात कापूस, तुर, हरबरा, ही पिके उभी आहेत. ढगाळ वातावरणामूळे आणि पावसामुळे तूर पिकाचा फुलोरा गळण्याचा धोका उदभवला असून अळीचा धोका वाढला आहे.

-----------------------------------------